## दिवाणी किरकोळ अर्ज क्र.०२/२०२३ मधील निशाणी १ वरील आदेश

**१.** अर्जदार क्र.१ ते ३ यांनी हा अर्ज बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट, १८२७ चे कलम २ अन्वये वारस प्रमाणपत्र मिळणेसाठी दाखल केला आहे.

**२.** अर्जदार यांचे अर्जातील कथनांप्रमाणे अर्जदार क्र.१ यांचे पती व अर्जदार क्र.२ व ३ यांचे वडील आर्जुन शिवाजी मोरे हे दि.०१.०८.२०२२ रोजी चिंचाळा, ता.वडवणी, जि.बीड येथे मयत झाले आहेत. मयत आर्जुन शिवाजी मोरे यांना अर्जदार क्र.१ ते ३ हेच सरळ व कायदेशीर वारस असून त्यांना अन्य कोणीही कायदेशीर वारस नाहीत. अर्जदार यांना त्यांचे वैयक्तिक कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. सबब, अर्जदार क्र.१ ते ३ हे मयत आर्जुन शिवाजी मोरे यांचे वारस आहेत, असे वारस प्रमाणपत्र देणेत यावे, अशी विनंती अर्जदार यांनी केली आहे.

**३.** अर्जदार यांचे अर्जास कोणाचीही हरकत आहे किंवा कसे?, हे समजण्यासाठी दिनांक १४.०१.२०२३ रोजीचे दैनिक ''संकेत'' या बीड जिल्हयातील वृत्तपत्रामध्ये जाहीर नोटीस प्रसिध्द करणेत आली. या वृत्तपत्राची अस्सल प्रत निशाणी ११ वर आहे. तसेच, त्याबाबत जाहिरनामा देखील प्रसिध्द करणेत आला. तो जाहिरनामा निशाणी ७ वर आहे. याप्रमाणे जाहीर नोटीस व जाहिरनामा प्रसिध्द करुनही कोणाही इसमाने या कामी हजर होऊन अर्जदार यांच्या अर्जास आक्षेप घेतलेला नाही.

**४.** अभिलेखातील कागदपत्रे पाहिली. अर्जदारांतर्फे विधीज्ञ श्री.के.डी.काळे यांचा युक्तिवाद ऐकला.

**५.** अभिलेखातील कागदपत्रे पाहिल्यानंतर व अर्जदारांतर्फे विधीज्ञ यांचा युक्तिवाद ऐकल्यानंतर माझे विचारार्थ खालील मुद्दे उपस्थित होतात. ते मुद्दे व

त्यावरील कारणमिमांसेसहित निष्कर्ष खालील प्रमाणेः–

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | मयत आर्जुन शिवाजी मोरे यांना अर्जदार क्र.१ ते ३ हे कायदेशीर वारस आहेत, असे वारस प्रमाणपत्र मिळणेस अर्जदार हक्कदार आहेत काय ? | ........**होय.** |
| २. | अंतिम आदेश काय ? | ........**अर्ज मंजूर करणेत येत आहे.** |

## कारणमीमांसा

### मुद्दा क्र.१ बाबत :–

**६.** अर्जदार यांनी त्यांचे अर्जाचे पुष्टयर्थ निशाणी १० वर अर्जदार क्र.२ यांचे सरतपासाचे प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे.

**७.** अर्जदार यांनी त्यांचे अर्जाचे पुष्टयर्थ पुराव्या दाखल निशाणी १२ वर आर्जुन शिवाजी मोरे यांचे मृत्यू प्रमाणपत्र, निशाणी १३ वर अर्जदार क्र.१ यांच्या मतदार ओळखपत्राची प्रमाणित प्रत, निशाणी १४ वर अर्जदार क्र.२ यांच्या पॅन कार्डची प्रमाणित प्रत व निशाणी १५ वर अर्जदार क्र.३ यांच्या आधार कार्डची प्रमाणित प्रत असे कागद दाखल केले आहेत.

**८.** अभिलेखातील कागदपत्रांचे अवलोकन केले. निशाणी १२ वरील मृत्यू प्रमाणपत्र पाहिले असता आर्जुन शिवाजी मोरे हे दिनांक ०१.०८.२०२२ रोजी चिंचाळा, ता.वडवणी, जि.बीड येथे मयत झाल्याचे स्पष्ट होते. निशाणी १३ वरील अर्जदार क्र.१ यांच्या मतदार ओळखपत्राची प्रमाणित प्रत, निशाणी १४ वरील अर्जदार क्र.२ यांच्या पॅन कार्डची प्रमाणित प्रत व निशाणी १५ वरील अर्जदार क्र.३ यांच्या आधार कार्डची प्रमाणित प्रत पाहता अनुक्रमे अर्जदार क्र.१ ते ३ यांची ओळख स्पष्ट होते. अर्जदार यांनी त्यांचे अर्जात व अर्जदार क्र.२ यांनी त्यांचे सरतपासाचे प्रतिज्ञापत्रामध्ये आर्जुन शिवाजी मोरे हे दिनांक ०१.०८.२०२२ रोजी

मयत झाले असून त्यांना अर्जदार क्र.१ ही पत्नी आणि अर्जदार क्र.२ व ३ ही मुले या नात्याने वारस असल्याबाबत कथन केले आहे. अर्जदार यांनी केलेल्या या कथनांबाबत कोणीही वाद केलेला नाही. त्यामुळे, ती कथने अबाधित राहिली आहेत.

९. अभिलेखातील एकंदरीत कागदपत्रे ही अर्जदार यांनी त्यांचे अर्जात केलेल्या कथनांस पुष्टी देतात. अर्जदार यांच्या कथनांस कोणाही इसमाने या कामी हजर होऊन विरोध केलेला नाही. अभिलेखातील कागदपत्रे पाहिली असता अर्जदार यांच्यावर विश्वास ठेऊ नये, असा सकृतदर्शनी पुरावा अभिलेखात नाही. त्यामुळे, अर्जदार क्र.१ ते ३ हे मयत आर्जुन शिवाजी मोरे यांचे वारस असल्याबाबतचे वारस प्रमाणपत्र अर्जदार यांना देण्यास कोणतीही अडचण नाही. सबब, मी मुद्दा क्र.१ चे उत्तर होकारार्थी देत आहे.

**<u>मुद्दा क्र.२ बाबत</u> :–**

**१०.** वर नमूद केलेल्या विवेचनांवरुन मी खालील आदेश पारीत करीत आहे:–

**<u>आ दे श</u>**

१. अर्जदार यांचा अर्ज मंजूर करणेत येत आहे.

२. अर्जदार क्र.१ ते ३ हे मयत आर्जुन शिवाजी मोरे यांचे सरळ व कायदेशीर वारस आहेत, असे वारस प्रमाणपत्र अर्जदार यांना देण्यात यावे.

३. अर्जदार यांनी दिवाणी नियमावली मधील परिच्छेद क्रमांक ३१२ अन्वये वारस प्रमाणपत्र दिले तारखेपासून सहा महिन्यांचे आत किंवा वेळोवेळी मुदत वाढ दिली असेल त्या कालावधीत न्यायालयाला या प्रमाणपत्रा अंतर्गत मिळणारी सर्व मालमत्ता इत्यादी नोंदीबाबत खरा व योग्य लेखाजोखा द्यावयाचा आहे आणि तसेच, त्या तारखेपासून

पुढील एक वर्षात किंवा न्यायालयाने दिलेल्या मुदतीत न्यायालयात मालमत्ताबाबतीत खरा व योग्य लेखाजोखा, त्यात तुमच्याकडे आलेली मालमत्ता किंवा मालमत्तेची कशी विल्हेवाट, त्याबाबतीत दर्शविणारे सर्व हिशोब सादर करावेत.

–

Digitally signed by DHIRAJ MARUTI HINGLAJKAR
Date: 2023.02.22 12:19:03 +0530

**दिनांकः– २१.०२.२०२३** **(डी.एम.हिंग्लजकर)**

**ठिकाणः– वडवणी** **दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, वडवणी,**

**ता.वडवणी, जि.बीड.**

## Certificate

I affirm that the contents of this PDF file are word to word as per original judgment/order.

Sd/-
(Amol D. Mule)
Stenographer (Grade-3)
Civil Court Junior Division
Wadwani

| | | |
|---|---|---|
| Dictated on | : | 21.02.2023 |
| Transcribed on | : | 21.02.2023 |
| Checked and signed on | : | 22.02.2023 |